ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख १० जानेवारी, १९५४ | अंक ३

## विविध माहिती

**अमेरिकन आर्थिक मदत**—येत्या जूनअखेर संपणाऱ्या वर्षांत भारताला अमेरिकेकडून १०० नवीं रेल्वे एंजिनें आणि ५,००० वहातुकीचे डबे मिळणार आहेत. भारत आणि अमेरिका ह्यांच्या दरम्यान आर्थिक मदत मिळण्यासंबंधीं जो करार नुकताच झाला आहे, त्यांतील अटींप्रमाणें भारताच्या पंचवार्षिक कार्यक्रमाला मदत म्हणून वरील सामुग्री देण्यांत येणार आहे.

**रशिआनें पोलादाच्या किंमती उतरविल्या**—प. युरोपांतील बाजारांत रशिआनें स्वस्त भावानें पोलाद विकण्यास प्रारंभ केल्याचें समजतें. युरोपांतील कारखानदारांच्या संयुक्त-संघटनेनें पोलादाची जी किंमत ठेवली आहे तीपेक्षा रशिआची किंमत २० टक्क्यांनीं कमी आहे. रशिआचा हा पवित्रा तात्पुरता आहे कीं तो एक राजकारणी डाव आहे, ह्यासंबंधीं तपास करण्यास सुरवात झाली आहे.

**उत्तर प्रदेश सरकारचा सिमेंट कारखाना**—उत्तर प्रदेशांत रॉबर्टसगंज ह्या ठिकाणीं सरकारी मालकीचा जो सिमेंटचा कारखाना काढण्यांत येत आहे, त्यांत प्रत्यक्ष उत्पादन करण्यास चालू वर्षाचा मध्य येईल. कारखान्यांत रोज ७०० टन पोर्टलंड सिमेंट तयार होईल. कारखान्यांत काम करण्यास ६०० कामगार लागतील आणि खाणींत काम करण्यासाठीं आणखी ५०० कामगार लागतील. कारखान्याची व्यवस्था पाहण्यासाठीं एक बोर्ड स्थापन करण्यांत येणार आहे.

**सावकाश काम करण्याचा परिणाम**—ब्रिटनमधील बोटी बांधण्याच्या गोद्यांतील कामगारांनीं सावकाश काम करण्याचा संप केल्यामुळें कारखान्यांना बऱ्याच मागण्यांना मुकावें लागलें आहे. कामगारांनीं केलेली पगारवाढीची मागणी मालकांनीं अमान्य केल्यामुळें हा प्रसंग उद्भवला आहे.

**ताजमहालाजवळील बागेची व्यवस्था**—आग्रा येथील ताजमहालाच्या सभोंवार असणाऱ्या बागेची व्यवस्था भारतीय सरकार उत्तर प्रदेश सरकारकडून १ एप्रिलपासून आपणाकडे घेणार आहे. ह्या स्मारकाचें सौंदर्य कायम राखावयाचें असेल तर बागेची व्यवस्था मध्यवर्ती सरकारनें करणें जरूर आहे, असें मत पुराण वस्तु खात्यानें व्यक्त केलें होतें. बागेला पाणीपुरवठ्यासाठीं एक ट्यूब वेल खणण्यांत येणार असून पंपांचीहि सोय करण्यांत येणार आहे.

**वेंगुर्ला येथें काथ्याचा कारखाना**—त्रावणकोर-कोचीन राज्यांतील काथ्या परदेशीं पाठविणारी एक कंपनी वेंगुर्ला येथें काथ्याचा कारखाना काढणार असल्याचें समजतें. कंपनीचे असिस्टंट मॅनेजर श्री. सुब्रह्मण्यम् ह्या दृष्टीनें वेंगुर्ला येथें कारखान्याला सोयीस्कर अशा जागेची पहाणी करून गेले.

**रशिआंतील बोलपटांचा धंदा**—रशिआ बोलपटांची निर्मिति अधिक वाढविण्याच्या दृष्टीनें अधिक स्टुडिओज बांधीत आहे. मास्को शहरांत नवे स्टुडिओज बांधण्यांत येत असून ते दरवर्षी निदान ४० रंगीत बोलपटांची निर्मिति करूं शकतील, असा अंदाज करण्यांत येत आहे.

**जागतिक बँकेचें भारताला कर्ज**—ब्रिटननें जागतिक बँकेला दिलेल्या ६ कोटी पौंड रकमेंतून ५० लाख पौंड भारतासाठी मुक्त करण्याचें कबूल केलें असून भारतानेंहि ते घेण्याचें मान्य केलें आहे. ही रकम जागतिक बँकेकडून भारताला मिळालेलें कर्ज म्हणून मानली जाईल, आणि तीमधून भारताला आपला डॉलर्सचा खर्च भागविण्यास मदत होईल. रकमेपैकी ४५ लाख पौंड भारताचा नवा पोलादाचा कारखाना उभारण्यासाठीं खर्च करण्यांत यावयाचे आहेत.

**जडावपूर येथील कारखाना**—कलकत्त्याजवळ जडावपूर येथें नॅशनल इन्स्ट्रुमेंट्स फॅक्टरी हा कारखाना आहे. १९५२-५३ सालीं ह्या कारखान्यांत १८·१६ लाख रुपयांचीं हत्यारें तयार झालीं. १९५१-५२सालीं १४·०२ लाख रुपयांचीं हत्यारें तयार झालीं होती.

**नव्या कारखान्यांना परवाने**—१९५३ च्या इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट अँड रेग्युलेशन अॅक्टप्रमाणें ६३ नव्या कारखान्यांना परवानें देण्यांत आले. ह्या सर्व कारखान्यांचें मिळून भांडवल सुमारें १८·५ कोटी रुपये भरलें.

**रायपूर येथील औद्योगिक प्रदर्शन**—रायपूर येथें गेल्या नोव्हेंबरच्या ४ तारखेपासून ५ जानेवारीपर्यंत एक औद्योगिक प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. प्रदर्शन पहाण्यासाठीं रोज सुमारें १,००० प्रेक्षक येत असत. प्रदर्शनांत मालाचीं दुकानें तर होतींच; शिवाय मनोरंजनाचे कार्यक्रमहि ठेवण्यांत आले होते. त्यांत २० फूट खोलीच्या विहिरीच्या भिंतीकडेनें सायकल चालविण्याचाहि एक कार्यक्रम होता.

**नागांच्या प्रदेशांत तेलाचा शोध**—नाग टेकड्यांच्या पश्चिमेकडील भागांत भारतीय सरकारच्या भूस्तर खात्याच्या शोधकांना तेलाचा शोध लागल्याचें समजतें. नाग टेकड्यांत तेल सांपडणारा प्रदेश कित्येक चौरस मैल पसरलेला आहे. तेलाशिवाय कोळसा, तांबें, निकेल, पाटीचा दगड, इत्यादि खनिजेंहि ह्या भागांत सांपडतात.

**भारतासाठीं कॅनडाचीं रेल्वे एंजिनें**—कोलंबो मदत योजनेप्रमाणें कॅनडा भारताला १०० वाफेचीं रेल्वे-एंजिनें पुरविणार आहे. एंजिनांच्या बांधणीचें काम लवकरच सुरू होणार आहे. कॅनडाचें सरकार आणि कॅनेडिअन लोकोमोटिव्ह कंपनी ह्यांच्या दरम्यान एंजिनें पुरविण्याच्या कराराबाबत वाटाघाटी चालू आहेत.

## कोयनेचें महाराष्ट्राला आव्हान

हेळवाक जवळील कोयना नदीवरील धरणाच्या योजनेच्या प्रत्यक्ष कामाचा मुहूर्त दि. १६ रोजीं मुंबई राज्याचे मुख्य मंत्री श्री. मुरारजीभाई देसाई ह्यांनीं मोठ्या समारंभानें केला. पांच–सहा वर्षांत कोयनेची वीज उपलब्ध होईल, असा आजचा अंदाज आहे. ह्या विजेचा योग्य वापर करून लहान–मध्यम–मोठे उद्योगधंदे व शेती ह्यांचा विकास महाराष्ट्रास करता आला पाहिजे, हें उघड आहे. केवळ धरण झाल्यानें व डोंगरांवरील तारांतून वीज वाहिल्यानें महाराष्ट्र समृद्ध होणार नाहीं. स्वस्त व सोईस्कर अशा प्रेरक शक्तीचा किफायतशीर उपयोग करण्यासाठीं भांडवल, योजनाचातुर्य आणि संघटना ह्यांची मोठीच आवश्यकता आहे. कोयना योजनेनें महाराष्ट्राला जणुं आव्हानच दिलेलें आहे. ही योजना सत्वर पुरी होवो आणि तिचें इष्ट फळ मिळविण्याची पात्रता त्याबरोबरच वाढत जाऊन महाराष्ट्राचें आर्थिक व त्या पाठोपाठ राजकीय पाऊल पुढें पडून सर्वांगीण उद्धारास चालना मिळो, अशी प्रार्थना आहे.

संपादक

---

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें

( कंसांतील आंकडे मागील वर्षाच्या ( १९५२ ) त्या त्या बाबींचे आहेत. )

| | |
|---|---|
| कर्जरोख्यांच्या विक्रींत आलेला तोटा ( रु. ३४,१५६–३–० ) व नोकरवर्गास बोनस देण्यासाठीं केलेली तरतूद ( रु. २५,०००/– ) वजा जातां बँकेस ३१–१२–५३ अखेर संपणाऱ्या वर्षीं झालेला निव्वळ नफा. | रु. २,८८,१०२—३—६<br>( रु. २,५४,५२०—३–११ ) |
| अधिक गुदस्त सालचा नफा ( शिल्लक पुढें ओढलेली ) | रु. ५८,३६९–१४–१०<br>( रु. ५४,८४९–१०–११ ) |
| एकूण | रु. ३,४६,४७२—२—४<br>( रु. ३,०९,३६९–१४–१० ) |
| वजा वांटणी ( संकल्पित ) इन्कमटॅक्ससाठीं तरतूद. | रु. १,४७,०००—०—०<br>( रु. १,२०,०००—०—० ) |
| रिझर्व्ह व इतर फंडांत जमा करणें. ( हे फंड आतां ७,००,००० रु. होतील.) | रु. ८४,०००—०—०<br>( रु. ५१,०००—०—० ) |
| करमाफ द. सा. द. शें. ५% डिव्हिडंड देण्यासाठीं तरतूद. | रु. ८०,०००—०—०<br>( रु. ८०,०००—०—० ) |
| ही रकम पुढील वर्षाच्या नफ्यांत मिळविली जाईल. | रु. ३५,४७२—०—०<br>( रु. ५८,३६९–१४–१० ) |

## दि डेक्कन बँक्स असोसिएशन, पुणें.

### भाभा कमिटीस निवेदन व प्रतिनिधी मंडळाची साक्ष

खाजगी उद्योगधंद्यांना मोठ्या प्रमाणावर बँका भांडवलपुरवठा कसा करूं शकतील व त्यांच्या अडचणी काय आहेत, हा भाभा कमिटीपुढें विचारासाठीं महत्त्वाचा भाग होता त्यास अनुसरून कमिटीनें डेक्कन बँक्स असोसिएशनकडे प्रश्नावली पाठवून त्यावर असोसिएशनचीं मतें व भेटीसाठीं प्रतिनिधींमंडळ बोलाविलें होतें.

असोसिएशननें श्री. एन्. एन्. क्षीरसागर, मॅनेजिंग डायरेक्टर, भारत इंडस्ट्रिअल बँक पुणें, श्री. जी. जी. साठे, मॅनेजर, बँक ऑफ पूना, श्री. एम्. व्ही. शिंगरे, चेअरमन, भोर स्टेट बँक व असोसिएशनचे असिस्टंट सेक्रेटरी श्री जी. जी. अधिकारी असें प्रतिनिधींमंडळ मुंबईला ता. १३–१–५४ रोजीं पाठविलें होतें. असोसिएशनचें सर्व प्रश्नांवर लेखी म्हणणें सादर करितांना श्री. क्षीरसागर यांनीं पुढील महत्त्वाच्या बाबी कमिटीच्या पुढें मांडल्या:—

( १ ) उद्योगधंद्यांना लागणारीं लांब मुदतीचीं कर्जे देतांना लांब मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यास व त्यावर व्याजाचे दर वाढवून देण्याचे धोरणास रिझर्व्ह बँकेनें पाठिंबा देणें; संमति देणें. ( २ ) ज्या औद्योगिक अथवा व्यापारी कंपन्यांची उभारणी भक्कम पायावर असून ज्या गेल्या कित्येक वर्षें नफा वाटीत आहेत अशा कंपन्यांच्या शेअर्सवर दिलेला ॲडव्हान्स, शेअर्स मार्केटवर नसले तरी, ' सुरक्षित ' ' सिक्युअर्ड ' समजणें. ( ३ ) औद्योगिक भांडवलपुरवठा करण्यासाठी नवीन कंपन्या अथवा ट्रस्ट कंपन्या स्थापन करण्याऐवजीं कांहीं मर्यादेपर्यंत हा पुरवठा सरकारनें ( रिझर्व्ह बँकेनें ) हल्लीं चालूं असलेल्या बँकांचे मार्फतें करावा. ( ४ ) शास्त्री अवार्ड व नोकर कायदा तसेच इंडस्ट्रिअल रिलेशन्स कायद्यानें उत्पन्न झालेल्या अडचणी; बँकांचे फंड्स रेमिटन्ससंबंधीं सवलती. ( ६ ) क्लिअरिंग हाऊससंबंधीं सवलती. ( ७ ) नॉन-मार्केटेबल शेअर्सचे कर्जासंबंधीं एक अधिकृत यादी तयार करण्याची सूचना. वगैरे अनेक प्रश्नांवर सांगोपांग चर्चा सुमारें १ तासपर्यंत झाली.

---

### टाटा डिफर्डचें ऑर्डिनरींत रूपांतर

टाटा आयर्न अँड स्टील कंपनीच्या डिफर्ड शेअर्सचें ऑर्डिनरी शेअर्समध्यें रूपांतर करण्यास मुंबई हायकोर्टानें मंजुरी दिली आहे. प्रत्येक एक डिफर्ड शेअर = सहा ऑर्डिनरी शेअर्स, असें रूपांतराचें प्रमाण ठरलें आहे.

---

### पुणें सें. को. बँकेच्या खेड शाखेची इमारत

पुणें सेंट्रल को. बँकेच्या खेड शाखेच्या नवीन इमारतीचा उद्घाटन समारंभ शनिवार, दि. २३ रोजीं श्री. पी. जे. चिन्मुळगुंद, सहकारी खात्याचे रजिस्ट्रार, ह्यांच्या हस्तें होणार आहे.

---

### श्री. पु. पां. गोखले ह्यांचा सत्कार

दि कऱ्हाड अर्बन को. बँकेचे अध्यक्ष, श्री. पु. पां. उर्फ बाबूराव गोखले, ह्यांच्या तैलचित्राचा अनावरण समारंभ बँकेच्या सभागृहांत शनिवार, दि. २३ रोजीं महर्षि अण्णासाहेब कर्वे ह्यांच्या हस्तें होणार आहे. त्याचवेळीं श्री. गोखले ह्यांना सत्कार-समितीच्या वतीनें थैली अर्पण करण्यांत येणार आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १० जानेवारी, १९५४



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## १९५३ चीं आर्थिक परिस्थिति व १९५४ बद्दल थोडासा अंदाज

ऑस्ट्रेलियामध्यें सिडने येथें ता. ८ जानेवारीपासून सुरू झालेल्या ब्रिटिश राष्ट्रकुटुंबांतील अर्थमंत्र्यांच्या परिषदेला जाण्यापूर्वी अर्थमंत्री श्री. देशमुख यांनीं हिंदच्या आर्थिक परिस्थितीबद्दल एकंदर समाधान व्यक्त केलें. कदाचित् मंदी निर्माण झाली तरीहि पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमामुळें हिंदला त्याहि परिस्थितीला चांगल्या रीतीनें तोंड देतां येईल, अशाहि आशयाचे श्री. देशमुख यांचे विचार ता. ७ जानेवारी रोजीं प्रसिद्ध झाले आहेत. उद्योगधंद्यांचें व शेतीमालाचें उत्पादन १९५३ मध्यें वाढलें आहे याबद्दल कोणाचेंच दुमत नाहीं. हिंदमध्यें आतां अन्नप्रश्न उरलेला नाहीं अशा आशयाचे विचार कांहीं महिन्यांपूर्वीच अन्नमंत्र्यांनीं व्यक्त केले आहेत. नियंत्रणें व वांटपपद्धति यांचें, कांहीं अपवाद सोडून, उच्चाटन करण्यांत आलें आहे. परराष्ट्रीय व्यापाराची परिस्थिति १९५३ च्या उत्तरार्धांत किंचित् सुधारली आहे व याचें एक गमक म्हणजे स्टर्लिंग शिलकीचा आंकडा डिसेंबर १९५२ अखेर ६९० कोटि रु. होता, तो आतां सुमारें ७१५ कोटी रु. पर्यंत चढला आहे. १९५२ या वर्षी सर्वसाधारण वस्तूंच्या किंमतींचा निर्देशांक ३८६.९ होता तो १९५३ मध्यें सरासरी ३९३.९ इतका राहिला; म्हणजे वस्तूंच्या सर्वसाधारण किंमती जवळ जवळ स्थिर राहिल्या. म्हैसूर येथें ता. ७ जानेवारी रोजीं मजूरपरिषदेपुढें अध्यक्ष या नात्यानें भाषण करतांना मजूर मंत्री श्री. गिरी म्हणाले कीं, नोंदवलेल्या बेकारांचा आंकडा नोव्हेंबर १९५३ पासून किंचित् उतरूं लागला आहे. मालक-मजूर संबंध १९५३ मध्यें १९५२ च्या मानानें जास्त समाधानकारक राहिले व कामगारांच्या फुकट गेलेल्या दिवसांची संख्या आणखी कमी झाली. पंचवार्षिक योजनेचा कार्यक्रम अपेक्षेप्रमाणें यशस्वी होत आहे, असें सरकारी आंकडे सांगतात व १९५६ ते ६१ या काळासाठीं दुसरी पंचवार्षिक योजना कोणत्या स्वरूपाची असावी याबद्दल विचार चालू आहेत. दुसरी पंचवार्षिक योजना सुमारें ४ हजार कोटी रु. खर्चाची असेल व त्यांत औद्योगिक विकासावर विशेष भर दिला जाईल. कापडाच्या उत्पादनानें १९५६ सालीं साधावयाचा उच्चांक १९५३ मध्येंच गांठला. निर्गत व्यापाराला शक्य त्या प्रकारें चालना देण्याकडे व्यापार खात्याचें लक्ष जून १९५३ पासून लागलें आहे. १९५३ मध्यें दोन वेळां व १९५४ च्या सुरवातीला जाहीर करण्यांत आलेलें आयातविषयक धोरण सामान्यपणें गिऱ्हाईक, व्यापारी व कारखानदार या सर्वांच्याच दृष्टीनें समाधानकारक आहे. रिझर्व्ह बँकेनें चहाच्या लहान मळेवाल्यांना योग्य वेळीं मदत करून येणारें संकट टाळलें. व्यापारी लोकांच्या हिताच्या दृष्टीनें बिलांच्या तारणावर पैसा देण्याची व्यवस्था व शेतकरीवर्गाला जास्त प्रमाणांत पैसा कर्जाऊ मिळावा याबद्दलची सोय रिझर्व्ह बँकेनें केली, व बँकांवर योग्य प्रकारें नियंत्रण ठेवलें. आयुर्विमा कंपन्यांना १९५३ हें वर्ष १९५२ च्या मानानें समाधानकारक गेलें, हें लॅप्स होणाऱ्या पॉलिसींच्या कमी झालेल्या प्रमाणावरून दिसून येतें. मध्य व राज्यसरकारांची कर्जउभारणी, सेव्हिंग बँकेच्या ठेवींचें प्रमाण व नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेटसची विक्री या बाबतींत १९५३ वर्ष बरेंच समाधानकारक गेलें. जर्मन तज्ज्ञांच्या सहकार्यानें सरकारनें वार्षिक ५ लक्ष टन उत्पादनाचा पोलादाचा कारखाना उभारण्याची योजना निश्चित केली आहे. या सर्व गोष्टी १९५३ हें वर्ष आर्थिक दृष्ट्या कांहींसें समाधानकारक गेलें, हें स्पष्टपणें दाखवितात.

परंतु १९५३ सालीं आर्थिक दृष्ट्या सर्वत्र आबादीआबाद होती, असें मुळींच नव्हे. उत्पादन वाढ झाली तरी कापड, मीठ, प्लॅस्टिक्स, साबण, कोळसा, चहा, सिमेंट, इ. धंद्यांच्या अडचणी विशेष रीतीनें वाढल्या. परकी भांडवलाला दिलेल्या सवलतींबद्दल कारखानदार संघटनांना अनेक वेळां सरकारकडे तक्रारी कराव्या लागल्या. कामगारवर्गावरील वाढता खर्च व करांचें डोईजड दडपण या सर्व क्षेत्रांतील कारखानदारांच्या मुख्य अडचणी आहेत व १९५३ मध्यें त्या कारखानदार-संघटनांच्या अधिवेशनांतून अनेक वेळां व्यक्त करण्यांत आल्या. हातमाग व तेलघाणी या दोन ग्रामोद्योगांना मदत करण्याचें सरकारी धोरण कारखानदारांच्या मतें योग्य नाहीं. उत्पादन वाढलें तरी खाजगीरीत्या उद्योगधंद्यांत भांडवल अपेक्षेपेक्षां बऱ्याच कमी प्रमाणांत गुंतविलें गेलें. जलवाहतूक धंद्याहि सरकारी कर्जाच्या अटी जास्त सवलतीच्या असतील तरच पंचवार्षिक योजनेप्रमाणें सरकार देऊं करीत असलेल्या कर्जाचा उपयोग करूं शकेल. रस्त्यांची अपुरी वाढ व मोटारींवरील डोईजड कर याहि अडचणी गेल्या वर्षी प्रामुख्यानें पुढें मांडण्यांत आल्या. सामान्य जनतेच्या दृष्टीनें बोलावयाचें तर जनतेची क्रयशक्ति घटतच गेली, व त्यामुळें कापड, साखर, साबण, इ. विक्री माल विपुल असूनहि तो खपला गेला नाहीं व व्यापाऱ्यांजवळ माल पडून राहूं लागला. सार्वी दुकानें, छापखाने, शिवणकाम करणारे लोक, खाजगी वाहतूक, चामड्याच्या मालाचे विक्रेते, पुस्तक विक्रेते, इ. अनेक धंदेवाल्यांची १९५३ मध्यें एकच मुख्य तक्रार कीं धंद्याची सर्व क्षेत्रांत मंदी आहे. वीज उत्पादन करणाऱ्या कंपन्यांनीं धंद्याच्या अडचणींची पहाणी करून आपल्या अडचणी विशेष रीतीनें व्यक्त केल्या आहेत, त्या अशा कीं, भांडवलावर ५ टक्क्यांऐवजीं निदान ६ टक्के व्याज देण्याची परवानगी ठेवल्याशिवाय खासगीरीत्या या धंद्यांत विकासासाठीं भांडवल मिळूं शकणार नाहीं. रेल्वेच्या वाहतुकीच्या बाबतींत अजूनहि कांहीं ठिकाणीं अडचणी आहेत: विशेषतः कोळशाच्या बाबतींत. पंचवार्षिक योजनेचा खेडेगांवांतून होणारा खर्च, लोकांकडून मागणी नाहीं म्हणून केला जाणार नाहीं अशी माहिती नुकतीच व्यक्त करण्यांत आली आहे. बेकारीचा प्रश्न विशेषतः गेल्या जूनपासून महत्त्वाचा प्रश्न बनला आहे. शेतीच्या बाबतींत सहकारी शेतीचा प्रसार झालेला नाहीं, व जमीनदारी पद्धत नष्ट करून कूळ-कायदे करण्यांत आले तरी शेतकऱ्याच्या आर्थिक अडचणी दूर झालेल्या नाहींत किंवा

शेतकऱ्यानें स्वतःच्या प्रयत्नानें शेतीचें उत्पादन वाढवलेलें नाहीं. कामगारवर्गाच्या कार्यक्षमतेंतहि कांहींच सुधारणा झालेली नाहीं. अजूनहि परदेशांच्या यंत्रसामुग्रीवर व लोकोमोटिव्हजवर मोठ्या प्रमाणांत अवलंबून राहावें लागत आहे.

वरील सर्व पार्श्वभूमि लक्षांत घेतली असतां १९५४ हें वर्ष गेल्या वर्षाच्या मानानें जास्त वाईट जाणार नाहीं हें निश्चित. कारण शेतीचें व कापड, मीठ, साबण, कोळसा इ. धंद्यांचें उत्पादन समाधानकारक राहील. नवीन अंदाजपत्रकांत कोणत्याहि प्रकारें करविषयक सवलती दिल्या जाणार नाहींत असें कांहीं दिवसांपूर्वी अर्थमंत्र्यांनीं स्पष्टपणें सांगितलें. यामुळें १९५४ मध्यें खासगी रीत्या भांडवल-संचय व भांडवल-गुंतवणूक १९५३ प्रमाणेंच अगदीं अपुऱ्या प्रमाणांत होईल असा संभव दिसत आहे. परराष्ट्रीय व्यापाराची परिस्थिति किंचित् सुधारेल; कारण निर्गत वाढविण्याचे योग्य दिशेनें प्रयत्न केले जात आहेत. परंतु साखरेचें उत्पादन कमी होईल अशीं लक्षणें अगदीं अलिकडे दिसूं लागलीं आहेत. वस्तूंचे बाजारभाव कदाचित् स्थिर राहतील, परंतु त्यामुळें वर्षानुवर्षें ताण पडलेल्या मध्यम वर्गाची परिस्थिति मुळींच सुधारूं शकणार नाहीं.

सामान्य जनता व मध्यमवर्ग यांची परिस्थिति किंवा क्रयशक्ति सुधारल्याशिवाय एकंदर अर्थव्यवहाराच्या चक्राला चालना मिळणार नाहीं, हें निश्चित. हा प्रश्न सोडवावयाचा म्हणजे उत्पादनाचा खर्च फार कमी झाला पाहिजे व विक्री-माल अगदीं सामान्य जनतेच्या आटोक्यांत आला पाहिजे. यामुळें आपली निर्गत वाढावयासहि मदत होईल. कारण, आज आपला माल जागतिक बाजारपेठेंत खपण्याच्या बाबतींत मुख्य अडचण आपला माल महाग असतो, ही आहे. मालाच्या उत्पादनाच्या किंमती उतरून माल अंतर्गत व परदेशच्या बाजारपेठेंत खपूं लागला म्हणजे सध्यां दिसून येणारें मंदीचें वातावरण दूर होऊन परिस्थिति हळूहळू सुधारत जाईल. ही परिस्थिति भांडवल संचयाच्या दृष्टीनेंहि उपयुक्त ठरेल. मात्र, किंमती उतरविण्याच्या धोरणाला शक्य तों लौकर सुरवात करण्यांत आली पाहिजे.

अमेरिकेंत मंदी उद्भवली तर काय, हा एक प्रश्नच आहे. कदाचित् चालू वर्षीं मंदी उद्भवेल, किंवा कांहींच्या मतें १९५५ मध्यें मंदी येईल. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ कोलिन क्लार्क यांचें मत अमेरिकेंत निश्चित मंदी उद्भवणार असें आहे. मंदीला तोंड देण्यासाठी अर्थ खातें व रिझर्व्ह बँक उपाययोजना सुरू करतीलच. मात्र यापुढें उद्भवणारी मंदी १९२९ च्या मंदीइतकी जाचक ठरणार नाहीं हें निश्चित.

---

## केळ्यांसाठी प्लॅस्टिकचें संरक्षक आवरण

दक्षिण अमेरिकेंतील केळी दूरदूरच्या बाजारपेठांत पाठवितांना प्लॅस्टिकच्या पारदर्शक आवरणाचा उपयोग केला जातो. त्या आवरणाची जाडी एक-सहस्रांश इंच असते.

बागायतदार व मालवाहू बोटींचे मालक यांना असें आढळून आलें आहे कीं, ताज्या केळ्यांचा गोड सुवास त्या आवरणामुळें टिकून राहतो. प्लॅस्टिक (पॉलीथायलीन) फिल्मच्या आवरणामुळें फळांतील ओलावा कायम राहतो आणि दूर देशांतील बाजारपेठेंत माल उतरण्याच्या वेळीं तीं फळें फारशीं सुकलेलीं असत नाहींत. आवरणाचा दुसरा एक परिणाम असा होतो कीं, केळीं पिकून त्यांना सतेज पिवळा रंग चढतो.

## उत्तर प्रदेशामधील विद्यापीठांना मदत

उत्तर प्रदेशामधील विद्यापीठांना चालू फडणिशी वर्षांत बरीच मदत करण्याचा विचार राज्य सरकार करीत आहे. राज्यांतील लखनौ आणि अलाहाबाद ह्या विद्यापीठांना सुमारें ५० लाख रुपयांचा तोटा आलेला असून त्यावर त्यांना बरेंच व्याजहि द्यावें लागत आहे. प्रत्येक विद्यापीठाला २५ लाख रुपये रकमेचा तोटा आलेला आहे. गेल्या वर्षीं तर अलाहाबाद विद्यापीठाची आर्थिक परिस्थिति फारच खालावली होती. आर्थिक तंगीचा परिणाम म्हणून विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनीं सरकारला असें कळविलें होतें कीं, राज्य सरकारनें तावडतोब मदत केली नाहीं तर आपणांस आपल्या नोकरांचे पगार देणेंहि अशक्य होईल. सरकार विद्यापीठांना जी मदत देईल तिचा अगर विद्यापीठांच्या उत्पन्नाचा विनियोग अधिक योग्य रीतीनें आणि काटकसरीनें करण्यांत यावा, अशी सरकारची इच्छा आहे. हा हेतू पूर्ण करण्यासाठी सरकारनें आग्रा विद्यापीठाच्या अर्थसमितीची घटनाहि बदलून घेतली आहे. विद्यापीठाच्या पैशाचा दुरुपयोग अगर उधळपट्टी होऊं नये म्हणूनच हा बदल करण्यांत आला आहे; अलाहाबाद विद्यापीठाच्या घटनेंतहि अशा प्रकारचे बदल करण्यांत येणार असल्याचें समजतें. राज्याचे शिक्षणमंत्री श्री. हरगोविंदसिंग ह्यांनीं चालू वर्षाच्या अंदाजपत्रकावरील चर्चेच्या वेळीं विद्यापीठांना असें आश्वासन दिलें होतें कीं अलाहाबाद व लखनौ विद्यापीठांचा तोटा सरकार तीन वर्षांत भरून काढण्याची व्यवस्था करील. परंतु हें कार्य साधण्यासाठी सरकारला विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनीं सहकार्य दिलें पाहिजे.

---

## भुइमुगाचें पीक

भुइमुगाच्या उत्पादनाच्या बाबतींत जगांतील प्रमुख देशांपैकीं भारत एक आहे. १९४८ मध्यें भुइमुगाच्या जागतिक लागवडीच्या ३४·५ टक्के लागवड व उत्पादनाच्या ३० टक्के उत्पादन एकट्या भारतांत झालें होतें. मद्रास, मुंबई व हैद्राबाद या राज्यांतच भारतांतील भुइमुगाखालील सुमारें ७८ टक्के क्षेत्र असून कॉरोमांडल व पीनट या दोन जाती प्रामुख्यानें पिकविल्या जातात. तेलाचा अंश कमी असणारी एक जात सौराष्ट्रांत पिकविली जाते व खाण्यासाठी तीच पसंत केली जाते. भारतांतील पीक प्रामुख्यानें निर्यातीचा माल म्हणून काढण्यांत येतें आणि अर्थातच निर्यात मागणी व जागतिक किंमती यांचा या देशांतील त्याच्या लागवडीच्या विकासावर निश्चितपणें परिणाम होतो. गेल्या दहा वर्षांत भारतांतील भुईमुगाच्या आर्थिक स्थितीचें चित्र पार पालटलें आहे. दुसऱ्या महायुद्ध-पूर्व काळांत निर्यातीला असलेलें महत्त्वाचें स्थान आतां अंतर्गत खपाला आलें आहे. दुसऱ्या महायुद्धापूर्वी एकूण उत्पादनाच्या ४९ टक्के पीक अंतर्गत खपासाठी वापरलें जाई; तेंच प्रमाण १९४९-५० मध्यें सुमारें ८२ टक्के होतें.

---

## तेल गाळणीचा धंदा

गेल्या १५ वर्षांत भुइमुगाचें तेल गाळण्याच्या धंद्यानें झपाट्यानें प्रगति केली आहे. दुसऱ्या युद्धापूर्वी तेल गाळणाऱ्या ३५० गिरण्या होत्या. परंतु १९४८ मधील चौकशींत सुमारें १,३३४ गिरण्या तेल गाळीत असल्याचें दिसून आलें. भुइमुगाचें तेल व पेंड यांच्या उत्पादनांतहि शंभर टक्के वाढ झाली आहे. १९४९-५० मध्यें उत्पादनापैकीं ७२ टक्के भुइमुगाचें तेल गाळण्यांत आलें व त्यापासून ६॥ लक्ष टनांहून अधिक तेल व १० लक्ष टन पेंड मिळाली. १९४९ मध्यें वनस्पती तुपाच्या धंद्यानेंहि १·६८ लक्ष मण भुइमूग तेलाचा उपयोग केला.

# औद्योगिक बेकारीनिवारणाचे दीर्घकालीन उपाय

( श्री. श्री. वा. काळे, संपादक "अर्थ" ह्यांचा चित्रमयजगत् औद्योगिक विकास विशेषांक, जानेवारी १९५४, मधील लेख. )

(२)

## उत्पन्नाची वांटणी उत्पादनवाढीस पोषक नाहीं : अनुकूल वातावरणाची आवश्यकता

परकीय भांडवलाची आयात रोडावली असल्यानें आणि भांडवलाची गरज मात्र वाढली असल्यानें, अंतर्गत भांडवल पुरवठा तरी वाढावयास हवा. परंतु एकट्या भारतानेंच नव्हे, तर आशियांतील इतरहि कित्येक देशांनींहि उत्पादन आणि उत्पन्न वाढण्याच्या अगोदरच शेतकरी, कामगार व कारकून ह्यांना मोबदला अधिकाधिक देण्याचें धोरण ठेवलें आहे. अर्थात् ह्या जनतेला अगोदरच भरपूर वेतन मिळत होतें, असें मुळींच नाहीं. त्यांची सध्यांची रहाणीहि अद्याप मोठी चांगली आहे असेंहि नाहीं. परंतु त्यामुळें उत्पादन-वाढीस मदत मात्र झालेली नाहीं; नोकरीविषयक परिस्थिति सुधारण्यास त्याचा हातभार लागलेला नाहीं. मालक वर्गाच्या हातीं उत्पादनाचा फायदा गेला असता तर तो पुनः उद्योगधंद्यांत गुंतूं शकला असता. गरिबांना मिळणारा मोबदला वाढल्यानें त्यांची परिस्थिति टिकून राहिली किंवा थोडीफार सुधारली; ती आणखी कितीतरी सुधारावयास हवी. पण हा वाढता मोबदला मिळाल्यानें त्यांची बचत वाढूं शकली नाहीं; कारण हें वाढतें उत्पन्न संपवून टाकण्यासाठी कितीतरी निकडीच्या गरजा वाट पहात होत्या व आहेत. अशा रीतीनें उत्पन्नाची वांटणी बदलली ती नव्या वांटेकऱ्यांस उपकारक झाली हें खरें असलें तरी राष्ट्रीय उत्पादनवाढीस बचतीच्या द्वारां भांडवल मिळत रहाण्याच्या दृष्टीनें ती सहाय्यकारक ठरली नाहीं; तशी अपेक्षाहि नव्हती. कराचा बोजाहि वाढत गेल्याकारणानें कूस न उरल्यामुळें सर्वांच्या बचतीस मारक अशीच ती घटना झाली. सामाजिक व आर्थिक उद्धाराच्या प्रचंड योजनांचें प्रारंभींचें दर्शनी फळ आणि आगामी न्याय्य व सामाजिक रचनेची चुणूक ह्या दृष्टीनें ही गोष्ट इष्ट ठरली, तरी राष्ट्रीय आर्थिक बळ वाढवण्याच्या दृष्टीनें घातक झाली. योजनांना शेकडों कोटी रुपयांची गुंतवणूक हवी. पण ती होण्याला आवश्यक ती परिस्थिति शिल्लक उरली नाहीं. भारत सरकार व त्याच्याच परिस्थितींतील इतर आशियाई सरकारें खासगी भांडवलदारांकडून अपेक्षा मात्र मोठाल्या बाळगून आहेत.

उत्पादनशक्तींत भर पडत राहिली पाहिजे. पण ती भर हळूहळू पडत राहील अशी आशा बाळगून भागणार नाहीं. बचतीस प्रोत्साहन मिळाले पाहिजे. भारतांतील गरीब-श्रीमंत सर्व लोकांनीं अर्धपोटीं राहून, आपली सर्व बचत उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी योग्य हातीं स्वाधीन केली, तरी हा स्वार्थत्याग पुरा पडणार नाहीं, एवढा मोठा भांडवली खर्च आपणांस भागविण्याचा आहे. बचतीला वावच नसेल, सर्व उत्पादन अगदीं आवश्यक गरजा भागविण्यासाठींच खर्चीं पडत असेल, तर वाढावा उरणार कसा आणि त्यांतून भांडवलनिर्मिति होणार कशी ? लोकांच्या मर्जीवर बचतीचें स्वरूप व प्रमाण अवलंबून ठेवलें, तर त्यापासून फारशी निष्पत्ति होणार नाहीं. कारण, अर्धपोटीं मनुष्याची प्राप्ति वाढली तर प्रथम तो पोट भरण्याकडेच तिचा उपयोग करणार हें उघड आहे. थंडींत कुडकुडणारा मनुष्य थंडीनिवारणास प्राधान्य देईल, का पंचवार्षिक योजनेच्या यशासाठी बचत मोहिमेंत भाग घेईल ? मनुष्य स्वार्थत्यागपूर्वक बचत करीलहि; पण त्यासाठीं सर्वच वातावरण पोषक हवें. केवळ ऐपत आहे म्हणून एखाद्यानें चैनींत पैसा खर्च केला, तर तो देशद्रोह गणला गेला पाहिजे. कार्यक्षमतेस आवश्यक असेल, त्यापेक्षा जास्त खर्च कोणीं करूं लागला तर त्यास प्रतिबंध झाला पाहिजे. तरच सामान्य माणसास उत्साह वाटूं शकेल. सरकारी योजनांवर होणारा खर्च काटकसरीनें केला पाहिजे; कमींत कमी खर्चांत जास्तींत जास्त निष्पत्ति होईल अशीच सर्वांची तळमळ पाहिजे; असें वातावरण निर्माण करण्याचें काम ज्यांचें आहे, त्यांनींच तें हातीं घेतलें पाहिजे. केवळ कामगारांवर दोषांचें खापर फोडून भागणार नाहीं. दूरगामी उपाययोजना त्वरित फलदायी होणार नाहीं, इतकेंच नव्हे तर प्रारंभींच्या काळीं रहाणीच्या मानांत पीछेहाटच सहन करावी लागेल. तरच बेकारीचा प्रश्न सुटण्याची आशा आहे. सरकारी सदिच्छा आणि कागदी योजना बेकारीनिवारण करूं शकणार नाहींत आणि औद्योगीकरणहि घडवून आणूं शकणार नाहींत. लोकांना अर्धपोटीं किंवा अर्धनग्न ठेवून निर्माण केलेल्या भांडवलसंचयाचा विनियोग कार्यक्षमतेनें झाला नाहीं, तर त्याचा परिणाम महाभयंकर होईल ह्याची जाणीव राज्यकर्त्यांना हवी. भारताच्या औद्योगीकरणाचें व बेकारीनिवारणाचें यश अंतर्गत बचतीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यावर, बचतीचा योग्य विनियोग करण्यावर आणि परकीयांची मदत योग्य अटींवर मिळविण्यावर अवलंबून रहाणार आहे. मलमपट्टीनें भागेल, इतकें हें दुखणें सोपें नाहीं. (अपूर्ण)

## पंचवार्षिक योजनेखाली पुणें जिल्ह्यांतील राष्ट्रीय विकास संघटना

राष्ट्रीय विकास संघटनेसाठी पुणें जिल्ह्यांतील हवेली तालुका निवडण्यांत आला असून त्यासाठी मुंबई सरकार १७,८७,५०० रुपये खर्च करणार आहे. याबद्दलची माहिती जनतेला देऊन विचार विनिमय करण्यासाठी हवेली तालुक्यांतील सर्व गांवकऱ्यांतील प्रमुख कार्यकर्त्यांची परिषद ता. ५-१-५४ रोजीं मंगळवारीं दुपारीं ३ वाजतां हडपसर येथील बंटर स्कूलमध्यें श्री. खान, प्रांतसाहेब हवेली भाग, यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. परिषदेस सहकारी खातें, शेतकी खातें, इंजिनियरिंग खातें व रेव्हिन्यू खातें वगैरे खात्यांतील प्रमुख अधिकारी वर्ग व तालुक्यांतील प्रमुख कार्यकर्ते मिळून सुमारें ७००-८०० मंडळी उपस्थित होती. विकासयोजनेसंबंधी आमदार श्री. मगर, डेप्युटी रजिस्ट्रार श्री. चिटणीस, शेतकी खात्याचे अधिकारी, पब्लिसिटी ऑफिसर श्री. सामंत, इंजिनियर श्री. देसाई, वगैरे अधिकाऱ्यांनीं योजना समजावून सांगितल्या. नंतर डॉ. मोडक, डॉ. उपाध्ये, श्री. गोखले वकील, श्री. घुले पाटील, श्री. बोरकर चेअरमन पुणें सें. को. बँक वगैरे, पुढाऱ्यांचीं सहकार्य करून योजनेला पाठिंबा देणारीं भाषणें झालीं. त्याचवेळीं कांहीं गांवाच्या पुढाऱ्यांनीं आपल्या गांवच्या योजना मे. प्रांतसाहेब यांना सादर केल्या. मुंबई सरकारचे आभार मानून या योजनेला संपूर्ण सहकार्य देण्याचा ठराव झाल्यानंतर पुणें जिल्हा सहकारी बोर्डाचे चेअरमन, श्री. जे. टी. सावंत, यांनीं सर्व उपस्थित मंडळींचे आभार मानले व हा समारंभ संपला.

**जर्मनी बोटी बांधूं लागला**—हँबुर्गमधील बोटी बांधण्याच्या कारखान्यांना प. जर्मन सरकार आणि कांहीं स्थानिक संस्था बरीच मदत करणार आहेत. त्यांच्याकडून मिळणाऱ्या कर्जामुळें जर्मनींत बोटी बांधण्याच्या धंद्याला खूप काम मिळेल असा अंदाज आहे. सरकारचें बेकारी-विमा खातेंहि १ कोटी मार्कस् कर्ज देणार आहे.

## कोल्हापूर बँकेची पुनर्घटना योजना

दि बँक ऑफ कोल्हापूर लि., च्या डायरेक्टर्स बोर्डानें आंख-लेली बँकेच्या पुनर्घटनेची योजना मुंबई हायकोर्टास सादर कर-ण्यांत येत आहे. १०० रु. किंवा त्यापेक्षां कमी ठेव असणारांना सर्व रक्कम एकदम देणेची व १०० रु. पेक्षां अधिक रक्कम या बँकेत असणाऱ्या ठेवीदारांना ७५ टक्के रक्कम तीन वर्षांत देणेची तरतूद या पुनर्घटनेच्या योजनेंत आहे. बँक ऑफ कोल्हापूरचें एकंदर येणें ५७ लक्ष रु. असून एकंदर देणें ३२ लक्ष रुपये असल्याचें योजनेंत नमूद केलें आहे. या योजनेस हायकोर्टाची मान्यता मिळाल्यास बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची पुनर्घटना करावी लागेल. सध्यां सर्व डायरेक्टर्स शेअर होल्डर्सतर्फे निवडून आले आहेत. त्याऐवजीं नवीन बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवर ठेवीदारांचे डायरेक्टर्स बहुसंख्य येतील.

## कोल्हापूर बँकेसाठीं हंगामी लिक्विडेटर

बँकेच्या एक ठेवीदार श्रीमती सुमतिबाई पेंडसे यांनीं आपली ठेव बँकेकडून मिळत नसल्यानें बँक लिक्विडेशनमध्यें काढावी असा अर्ज मुंबई हायकोर्टाकडे दिला होता. त्याचा विचार करून श्री. बनाजी यांना मुंबई हायकोर्टानें कोल्हापूर बँकेचे हंगामी लिक्विडेटर म्हणून नेमणूक केली आहे. कोल्हापूर बँकेच्या डायरेक्टर्सनीं हायकोर्टास सादर केलेल्या पुनर्घटना योजनेवर हायकोर्ट निर्णय घेईपर्यंतच हंगामी लिक्विडेटरनें काम करावयाचें आहे. पुनर्घटना योजनेच्या विचाराची ता. ८ फेब्रुवारी १९५४ ही पुढील तारीख नेमण्यांत आली आहे.

## भूदान–यात्रेंत पाश्चात्य महिला

सौ. एलविन रेनॉल्डस या नांवाची एक पाश्चात्य महिला कार्यकर्त्या सध्यां विनोबांबरोबर बिहारमध्यें भूदान–यात्रेंत फिरत आहेत. त्या मूळ ऑस्ट्रियांतील राहणाऱ्या. पण सध्यां इंग्लंडमध्येंच त्या वास्तव्य करून आहेत. त्या समाजवादी आहेत. गेले तीन–चार महिने त्या भूदान-कार्यांत आहेत. जयप्रकाशजींबरोबर त्यांनीं नुकतीच उत्तर प्रदेशमध्यें यात्रा केली. आतां बिहारमध्यें त्या आहेत. संपत्तिदानाचें महत्त्व समजून इंग्लंडहून येतांना बरोबर आणलेले जे थोडेबहुत दागिने आपल्यापाशीं होते ते त्यांनीं विनोबांना देऊन टाकले, एवढेंच नव्हे तर खर्चासाठी येतांना आणलेल्या रोख पैशांपैकीं सहावा भागहि त्यांनीं संपत्ति-दान–यज्ञांत अर्पण केला येथें आल्यावर त्यांनीं मोठ्या परिश्रमानें हिंदीचें अध्ययन केलें व सध्यां त्या हिंदींतच भाषण करतात.

## सेक्रेटरी, ट्रेनिंग क्लास, सासवड

पुरंदर तालुक्यांतील अनट्रेन्ड सेक्रेटरींसाठी सासवड येथें ट्रेनिंग क्लास भरविण्यांत आला आहे. या वर्गाचा उद्घाटन-समारंभ सासवड येथील मराठी शाळेंत सोमवार ता. ४।१।५४ रोजीं दुपारीं ४ वाजतां श्री. बळवंतराव कामत, वकील यांचे अध्यक्षतेखालीं पार पडला. उद्घाटनास सुमारें ७०।८० मंडळी हजर होती. को. ट्रे. इन्स्पेक्टर श्री. देशपांडे, श्री. पवार गुरुजी, श्री. पावसकर बँक एजंट व श्री. सुपरवायझर पुरंदर युनियन यांचीं क्लासचें महत्त्व व त्याची आवश्यकता या विषयावर भाषणें झालीं. क्लासला ४० विद्यार्थी आले असून क्लास २० फेब्रुवारी, १९५४ अखेर चालणार आहे.

**भारतामधील बोटींची बांधणी**—विजगापट्टम् येथील बोटी बांधण्याच्या कारखान्यांत सध्या दरवर्षी ३ ते ४ बोटी बांधण्या-इतकीच व्यवस्था आहे. कारखान्याची उत्पादनक्षमता दरवर्षी ८ बोटी बांधण्याइतकी वाढविण्याचा सरकारचा विचार आहे; बांधल्या जाणाऱ्या बोटींचें वजन ८ ते १० हजार टन असेल.

## कलकत्ता शहरामधील अपघात

कलकत्त्यामधील वहातुकीवर नियंत्रण ठेवणारे असिस्टंट कमिशनर ऑफ पोलिस मि. रॉबिन्सन ह्यांनीं शहरांतील अपघाता-संबंधीं पुढीलप्रमाणें माहिती सांगितली आहे. जगांतील कोणत्याहि प्रमुख शहरांपेक्षा कलकत्त्यामधील अपघातांचें प्रमाण कमी आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. गेल्या चार किंवा पांच वर्षांतील मोटारींच्या अपघातांत मृत्यु पावलेल्यांची संख्या दरवर्षी सरासरी १२० इतकीच आहे. मुंबईंत सरासरी वार्षिक संख्या २५० एवढी आहे. १९५३ सालीं कलकत्त्यांत ९८ अपघाती मृत्यु झाले; १९५२ सालीं ही संख्या ८४ होती. कलकत्ता शहरांत २१ डिसेंबर १९५३ रोजीं संपलेल्या आठवड्यांत वहातुकीची सुरक्षितता पाळण्याचा सप्ताह साजरा करण्यांत आला. त्या सप्ताहांत अप-घातांची संख्या बरीच घटलेली दिसून आली. कलकत्ता शहरांत एकूण ६९,००० वाहनें आहेत. त्यांची वर्गवारी केली तर ती अशी होते. ३६,००० खाजगी मालकीच्या मोटार गाड्या, ११,००० माल वहातुकीच्या अगर इतर लॉऱ्या, १,२०० मालाच्या मोटारी, १,२०० बसेस, ४२५ ट्रॅमगाड्या, ६,००० रिक्षा आणि ३,६०० मोटार–सायकली. गेल्याच्या गेल्या म्हणजे १९५२ सालीं ११,६०० अपघातांची अधिकृत रीत्या नोंद केलेली आढळून येते. १९५३ सालीं डिसेंबरच्या २३ तारखेपर्यंत १०,००० अपघातांची नोंद झालेली आहे. १९५२ सालीं ३,२०० लोकांना अपघातांत सांपडून इजा झाल्याची नोंद आहे. १९५३ सालीं २,८०० लोकांना इजा झालेल्या आहेत. कलकत्ता शहरांतील अपघातांची संख्या खरोखरच कमी असेल तर इतर मोठ्या शहरांतील वहातुकीच्या व्यवस्थापकांनीं त्याची दखल घेतली पाहिजे.

## औद्योगिक उत्पादनांत वाढ

भारताच्या औद्योगिक उत्पादनाचे १९५३ चे पहिल्या नऊ महिन्यांचे आंकडे उपलब्ध आहेत, त्यावरून १९५२ च्या तत्सम मुदतीच्या मानानें सरासरी जनरल इंडेक्स नंबरमध्ये ५.४% वाढ झाल्याचें आढळतें. सिमेंट, कागद, कपास, कापड आणि सूत ह्यांच्या उत्पादनांत बरीच वाढ झाली; परंतु ताग आणि पोलाद ह्यांच्या उद्योगांत घट झाली. इंडियन आयर्न अँड स्टील कंपनीच्या बर्नपूर येथील कारखान्यांत जानेवारी ते २४ ऑगस्ट काम मंद करण्याचा संप चालू होता व त्यानंतर २४ ऑगस्ट ते १८ सप्टेंबर टाळेबंदी होती, त्यामुळें उत्पादन ८८,००० टनांनीं घटलें. निर्गतीची मागणी उतरली, त्याचा परिणाम ताग व कोळसा ह्यांवर झाला. कपास कापडाच्या उत्पादनाची गति सालिना ५०० कोटी वार अशी होती; १९५२ मध्यें ती ४६० कोटी वार आणि १९४४ मध्यें (युद्धकाळांतील कमाल उत्पादनाचें वर्ष) ४८५ कोटी वार होती.

| | | जाने. ते सप्टें. १९५२ | जाने. ते सप्टें. १९५३ | वाढ अथवा घट % |
|---|---|---|---|---|
| कपास कापड | (कोटी वार) | ३३९ | ३७१ | + ९.४ |
| कपास सूत | (कोटी पौंड) | १०७ | ११३ | + ५.९ |
| ताग | (००० टन) | ७२ | ६५ | − ९.५ |
| सिमेंट | ,, | २६२ | २७५ | + ५.० |
| पोलाद (पहिले आठ महिने) | ,, | ७२ | ६३ | − १२.१ |
| कोळसा | (लक्ष टन) | २७१ | २७१ | — |
| कागद | (००० टन) | १०२ | १०५ | + २.९ |

## सोव्हिएट अर्थव्यवस्थेचीं कांहीं वैशिष्ट्यें

हैद्राबाद येथें भरलेल्या शास्त्रीय परिषदेला सोव्हिएट रशिआंतील शास्त्रज्ञांचें एक प्रतिनिधीमंडळ आलें होतें. ह्या मंडळांत डॉ. कॉर्नोकोव्हा ह्या अर्थशास्त्रज्ञहि होत्या. त्यांनीं रशिआच्या अर्थव्यवस्थेसंबंधीं कांहीं उपयुक्त माहिती सांगितली. ती 'अर्था'च्या वाचकांसाठी सारांशरूपानें दिली आहे:—

" रशिआची अर्थव्यवस्था पूर्वनियोजित असल्यामुळें उत्पादनाला पहिलें स्थान देण्यांत येतें. त्यांतहि रोजच्या गरजा भागविणाऱ्या वस्तू निर्माण करण्याकडे प्रथम लक्ष देण्यांत येतें. २० वर्षांपूर्वी रशिआंत पाव आणि लोणी मिळविण्यासाठी लोकांना रांका लावून उभे रहावे लागत असे. आतां खाद्यपदार्थांची विपुलता आहे पण मोटारी आणि रेडिओ ह्यांच्यासाठी आतां रांका लागल्या आहेत. ह्या वस्तू चैनीच्या नसून जरूरीच्या आहेत असें रशिअन लोकांना वाटतें. गेल्या आठ वर्षांत उपभोग्य वस्तूंच्या किंमती झपाट्यानें उतरविण्यांत आल्या. किंमतीमधील घट सरासरी ७५ टक्क्यांनीं झालेली आहे. रशिआंतील पदार्थांच्या किंमती अशा ठेवण्यांत येतात कीं त्यांच्यामुळें लोकांच्या खऱ्या म्हणजे वस्तूंच्या स्वरूपांतील वेतनांत वाढ व्हावी. रशिआंत किंमतींचा, उत्पादनाच्या खर्चाशीं फारच थोडा संबंध असतो. कांहीं वस्तूंच्या विक्रींत सरकार फायदा मिळवितें, तर कांहींच्या विक्रींत तोटा सोसतें. लोकांचे रहाणीचें मान वाढावें म्हणूनच ही गोष्ट पद्धतशीर रीतीनें करण्यांत येते.

" माणसांना काम करण्यास प्रलोभन वाटावें म्हणून वेतन हें गुणावर अवलंबून ठेवण्यांत येतें. शेतींत अगर उद्योगधंद्यांत छोटे धंदे चालविण्याचें स्वातंत्र्य रशिअन नागरिकांना असतें. उदा. छोटे ग्रामोद्योग, छोटी शेती, बारीकसारीक दुकानें, डेअरी, कोंबडी पाळणें, इत्यादि धंदे त्यांना स्वतंत्रपणें करतां येतात. सर्व जमीन ही सरकारच्या मालकीची आहे. सामुदायिक शेतीचा सभासद होणें ही गोष्ट सक्तीची नाहीं; ती खुषीची बाब आहे. उत्पादनाचे सामान्यतः तीन भाग करण्यांत येतात. पहिला भाग सरकारच्या मालकीचा असतो व तो सरकार कराच्या रूपानें गोळा करतें. दुसरा भाग हा सरकारच ठरलेल्या किंमतीला विकत घेतें आणि तिसरा भाग हा खुल्या बाजारांत विक्रीला पाठविला येतो. रशिआंत बेकारी अगर भांडवलाची घडण ह्याबद्दल प्रश्नच उत्पन्न होत नाहीं. कारण ह्या दोन्ही बाबींकडे सरकारच लक्ष पुरवितें. सध्यां रशिआची लोकसंख्या २० कोटी आहे. लोकसंख्या भरमसाठ वाढलेली नाहीं. उलट, सरकार मोठ्या कुटुंबांना उत्तेजनच देतें. "

---

### धी बँक ऑफ सिटिझन्स लि., बेळगांव

या बँकेचा ता. ३१ डिसेंबर, १९५३ अखेरचा ताळेबंद व नफातोटा पत्रक तयार झालें असून बँकेस गेल्या वर्षाप्रमाणेंच सर्व खर्च वगैरे वजा करून सुमारें २३,००० रुपये निव्वळ नफा झाला आहे व बँक यंदाहि शेअरहोल्डर्सना ४% करमाफ डिव्हिडंड देणार आहे, असें कळतें. त्याप्रमाणें डिव्हिडंडसाठी सुमारें १६,०००रु. खर्च पडणार असून बाकी रकम ' रिझर्व्ह 'ला जमा होईल. यावर्षीं बँकेची उल्लेखनीय कामगिरी म्हणजे बैलहोंगल शाखेसाठी स्वतःची स्वतंत्र इमारत केली आहे व बेळगांवलाहि स्वतःची मोठी इमारत करण्याच्या विचारांत बँक आहे. मुदती ठेवींत वाढ झालेली असून व्याज व कमिशन या उत्पन्नाच्या बाबींतहि प्रगति दिसून येत आहे. दरसालप्रमाणें छापील नफातोटा पत्रकें व ताळेबंद सर्व शेअरहोल्डर्सना योग्य वेळीं रवाना होतील, असें समजतें.

### हिंदी चहास चांगली मागणी

१९५२ चे प्रारंभीं ग्रेट ब्रिटनमध्यें हिंदी चहा पौंडास १ शिलिंग, ६ पेन्स ह्या दरानें विकला जात असे. चहाचें उत्पादन फार वाढलें ह्या दडपणाचा तो परिणाम होता. चहाच्या मळेवाल्यांची परिस्थिति त्यामुळें फारच बिकट झाली होती. १९५३ मध्यें परिस्थिति बरीच सुधारली आणि त्या वर्षाच्या जानेवारींत चहाची किंमत २ शिलिंग, ६ पेन्स झाली. तेव्हांपासून ती एकसारखी वाढत गेली आहे. ह्याचें कारण, हिंदी चहाचें घटलेलें उत्पादन हें होय. त्याबरोबरच, चहाचा खप ग्रेट ब्रिटनमध्येंच नव्हे, तर इतर देशांतूनहि वाढत आहे. कॉफी पिणें महाग झाल्याचाहि तो परिणाम आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें साखरेवरील नियंत्रणें उठल्यामुळें, लोक अधिकाधिक चहा पिऊं लागले आहेत. टेलिव्हिजन पहात बसणारे लोकांचे गट पेल्यामागून पेले चहा पितात, त्यामुळेंहि चहा अधिक खपत आहे. चहास मागणी असल्याकारणानें, चांगली पत्ती व सामान्य दर्जाची पत्ती ह्यांच्या किंमतीमधील तफावत फारशी उरलेली नाहीं.

---

### रेल्वे व मध्यवर्ती अंदाजपत्रकें

हिंदी रेल्वेजचें अंदाजपत्रक १७ फेब्रुवारी रोजीं पार्लमेंटास सादर करण्यांत येईल. २७ फेब्रुवारी रोजीं मध्यवर्ती अंदाजपत्रक मांडलें जाईल. दोन्ही अंदाजपत्रकांवर चर्चा मार्चमध्यें होईल.

---

### बॉंबे स्टेट फायनान्शिअल कॉर्पोरेशन

वरील कॉर्पोरेशनचे ४९ लक्ष रुपयांचे शेअर्स विक्रीकरतां काढले होते, परंतु ७५ लक्ष रुपयांच्या शेअर्सना मागणी आली आहे.

---


दि

# बँक ऑफ महाराष्ट्र लि.

मुख्य कचेरी : थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.


संचालक मंडळ

श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष)
श्री. श्री. गो. मराठे (उपाध्यक्ष)
श्री. धों. कृ. साठे
श्री. न. ग. पवार
श्री. मा. रा. जोशी
श्री. फ. दो. पद्मजी
श्री. मा. वी. शहा
श्री. शं. ल. किर्लोस्कर
श्री. भा. म. गुप्ते

बँकेच्या शाखा

मुंबई (फोर्ट, गिरगांव, दादर), कल्याण, पुणें (डेक्कन जिमखाना व खडकी), नाशिक, चाळिसगांव, धुळें, जळगांव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर, कोल्हापूर, द. हैद्राबाद, सांगली, अमरावती, ठाणें व हरिहर (म्हैसूर सं.)

चिं. वि. जोग,
मॅनेजर.



## हो, ही योजना माझ्यासाठींच आहे !

हजारों खेडयांतून विजेचे दिवे लागतील. हातमागांचे आवाज येऊं लागतील व चरक फिरूं लागतील. कामगारांचा प्रत्येक लहान गट वाढत्या ग्रामोद्योगाचें केन्द्र होईल. प्रत्येकाला काम मिळेल. व कोणीहि बेकार राहणार नाहीं. पंचवार्षिक योजनेमध्ये आपली विद्युत् शक्ति निर्माण करण्याचीं साधनें सुधारण्यासाठीं व वाढविण्यासाठीं १२७ कोट रूपये खर्च करण्याची तरतूद केली आहे. नानाविध उद्दिष्ट असलेल्या हायड्रो-इलेक्ट्रिक योजनांमुळें उद्योगधंद्यांना स्वस्त दरांत वीज पुरविणें शक्य होईल. जगांतील पुढारलेल्या राष्ट्रांत स्थान मिळविण्याचा आपल्या राष्ट्रानें केलेल्या निश्चयाचा हा पुरावा आहे.

**लाखो टन पोलाद पंचवार्षिक नियोजनांतील विविध योजना अमलांत आणण्यासाठीं वापरलें जाईल. आणि म्हणूनच, आपल्या राष्ट्राच्या व लोकांच्या अधिक सुसंपन्न व फलदायी भविष्याचा पाया घालण्यांत पोलाद अनेक महत्वपूर्ण त-हेनें उपयोगी पडेल**

**दी टाटा आयर्न ॲण्ड स्टील कंपनी लिमिटेड**

TN 3933


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं '**दुर्गाधिवास**', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.